**नि.फौ.ख.क्र. ६२/२०१५**

**नि. २०**

**अभियोग पक्षाकरता साक्षीदार क्र.१**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो ते खालीलप्रमाणे की,

नाव – सुर्यकांत विष्णू शिंदे उर्फ तांबोळी,

वय – ७६ वर्षे, धंदा – शेती,

पत्ता – शिरढोण, ता. कोरेगाव, जि. सातारा.

**<u>सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्री.पी.व्ही.बहुलेकर यांचेवतीने सुरु .</u>**

दिनांक ०४/०२/२०१५ रोजी दुपारी ०२.४५ च्या दरम्यान गावात पाईपलाईनचे काम चालू होते व त्यावेळी मी माझ्या घरी होतो. त्यावेळी आमच्या घरी नळाचे कनेक्शन मी जोडत होतो. त्यावेळी माझा पुतन्या प्रवीण शिंदे तिथे आला व म्हणाला की, कनेक्शन जोडू नका. मी त्याला म्हणालो की माझ्या हद्दीत आहे त्यामुळे मी कनेक्शन जोडणार. त्यावेळी त्याने मला उचलून आपटले, तसेच दगडाने उजव्या डोळयावर मारले. मला ज्या दगडाने मारहाण केली होती तो दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला आता गुन्हयातील जप्त केलेला दगड दाखवण्यात आला. त्याच दगडाने मला मारहाण झाली होती. सदर दगडास **आर्टिकल अ** देण्यात येते. मला दगडाने मारहाण झाल्यानंतर माझ्या डोळयातून रक्त येवू लागले. त्यानंतर जमलेल्या लोकांनी सोडवासोडव केली. त्यानंतर मी दवाखान्यात जावून पहिले उपचार घेतले व नंतर पोलीस स्टेशनला जावून तक्रार केली. मला आता तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येते. आरोपी आजरोजी न्यायालयात उपस्थित आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड. पी.के.बारसावडे यांच्यातर्फे सुरु–</u>**

माझे ७ वी चे शिक्षण झाले आहे. मी नोकरी केलेली नाही. आरोपीचे वडील जनार्दन माझा चुलत भाऊ आहे. जनार्दनचे वडील व माझे वडील हे चुलत चुलत भाऊ होते. मला ५ एकर १३ गुंठे जमीन आहे व आरोपीच्या वडीलांना ५ एकर १५ गुंठे जमीन होती. आरोपीच्या वडीलांनी ५६ आर जमीन विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की आमची जमीन व आरोपीची जमीन शेजारी शेजारी असून त्यामध्ये एकच बांध आहे. आरोपीचे क्षेत्र एका बाजूला व दुस–या बाजूला आमचे क्षेत्र आहे. माझे क्षेत्र उत्तरेला आहे व आरोपीचे क्षेत्र दक्षिणेला आहे.

हे म्हणणे खरे आहे की जमीनीवरुन सन १९८० पासून माझे आरोपीचे कुटुंबासोबत वाद होते. हे म्हणणे खरे आहे की सदर वाद रस्त्यावरुन व जमीनीच्या वहिवाटीवरुन होते. हे म्हणणे खरे आहे की पूर्वी आमच्यात झालेले वाटप हे रुमाल घडीचे होते व त्यामुळे आमच्यात वहिवाटीवरुन वाद होते. हे म्हणणे खरे आहे की सदर वादामुळे आमचे एकमेकांशी बोलणे व एकमेकांकडे जाणेयेणे बंद आहे. आरोपीचे वडील हयात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की माझे व आरोपीकचे घर दत्त मंदीराकडे जाणा–या रोडकडे आहे व सदर रस्ता आमच्या दोघांच्या घराच्या पूर्वेस आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे घर उत्तरेस आहे व आरोपीचे घर माझ्या घराच्या दक्षिणेस आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर रस्त्याला उत्तरेकडून दक्षिणेकडे डहाळ आहे व आमच्या घरांना लागून गटारे आहेत. हे म्हणणे खरे आहे की सदर गटारे चार ते पाच फूट खोल आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरोपीचे घर हे पांढरीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या वेळी माझे निम्मे घर आर.सी.सी.चे होते व निम्मे घर पांढरीचे होते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या घराला लागूनच आमचे बाथरुम आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या बाथरुममुळे त्याच्या घराला ओल येते असे आरोपीचे म्हणणे होते. हे म्हणणे खरे आहे की सदर बाथरुममध्ये जुना नळ होता. हे म्हणणे खरे आहे की शिरढोण गाव हे वसनेच्या काठाला आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा मुबलक आहे व सकाळी एक ते दीड तास पाणी असते. हे म्हणणे खरे नाही की जोपर्यंत पाणी असते तोपर्यंत आमचा नळ चालू असतो.

हे म्हणणे खरे आहे की गावात पाण्याची पूर्वी सिमेंटची पाईपलाईन होती. सदर पाईपलाईन सन १९८० ते १९८५ च्या दरम्यान टाकलेली होती. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी गावात पेयजल योजनेचे काम चालू होते व त्यामुळे दत्त मंदीराकडे जाणारा रस्ता जे.सी.बी.ने उकरलेला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे दगड, माती बाहेर आली होती. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी घरात जाताना पाय–या नसल्याने मुश्कील व्हायची व त्यामुळे घरात जाण्याकरीता ब–याच लोकांनी माझ्यासह फळया टाकल्या होत्या. त्यावेळी जो तो आपआपले नळ जोडत होता व ग्रामपंचायतचे देखील नळाचे काम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की खाजगी नळ जोडणी करण्याकरीता ग्रामपंचायतीची परवानगी लागते व त्याकरीता पैसे भरावे लागतात. हे म्हणणे खरे नाही की मी ग्रामपंचायतीत पैसे भरले नव्हते व माझ्याकडे परवानगी नव्हती. तक्रार देताना पैसे भरल्याची पावती व परवानगी मी पोलीसांना दाखवली होती. हे मला आठवत नाही की त्याची नक्कल मी पोलीसांना दिली होती किंवा कसे. घटनेच्या वेळी आरोपीसोबत त्याचे आई, वडील व भाऊ राहत होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या व आरोपीच्या घराच्या आजूबाजूला घरे आहेत. माझ्या घराला लागून नागेश डोळे याचे घर होते.

हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी नळ जोडणी व पाईपलाईनचे काम चालू असल्यामुळे पाटोळेच्या कोप–यात म्हणजेच आमच्या घराच्या आजूबाजूला बरीच लोकं होती. हे म्हणणे खरे नाही की मी कागद न बघता सही केली. त्यावेळी कागद एकच होता किंवा त्याला जोडून दुसरा कागद होता याच्याकडे मी लक्ष दिले नाही. त्यावेळी मी चार ते पाच कागदावर सही केली. हे मला आठवत नाही की कागदावर कागद चिटकलेला होता त्यावर मी सही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी सही केलेल्या कागदावर कागद चिटकवलेला आहे. हे मला आठवत नाही की कागदावर कागद चिटकवलेला होता त्यावर पोलीसांनी माझी सही घेतली नव्हती. मी इंग्रजीत सही करतो. हे म्हणणे खरे आहे की इंग्रजीत सही केल्यानंतर पुन्हा मराठीत सही करावी लागत नाही.

मी पोलीसांना तक्रार देताना आरोपीने मला उचलून आपटले होते असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर बाब पोलीसांनी तक्रारीत नमुद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर बाब पोलीसांनी माझ्या तक्रारीत का नमुद केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीने मला उचलून आपटले हे मी पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे. मी पोलीसांना तक्रार देताना रक्त आले होते हे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की जखम व रक्ताबाबत पोलीसांनी तक्रारीमध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर बाब माझ्या तक्रारीमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व माझ्यामध्ये वाकूडपणा आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी रस्ता उकरलेला होता व पाईपलाईनचे कामकाज चालू होते तसेच घरात जाणे अवघड होते त्यामुळे मी पडलो होतो. हे म्हणणे खरे आहे की घरात ओल फुटते ही आरोपीची सारखीच तक्रार होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचे घराची ओल गेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या डोळयातून पाणी येणे व कमी दिसणे ही १० ते १२ वर्षांपासूनची तक्रार आहे. हे म्हणणे खरे आहे की शिरढोण वरुन कोरेगाव येथे यायला सारखे रिक्षा व इतर वाहने असतात आणि तेथून १० मिनीटात माणूस कोरेगावला येतो. आदीशक्ती नेत्र रुग्णालय मधील निकम डॉक्टर यांच्याकडे आम्ही नेहमी जातो. घटनेच्या एक ते दोन वर्ष आधीपासून आम्ही त्या डॉक्टरांकडे जात होतो. त्यांच्याकडे माझ्या व माझ्या पत्नीच्या चष्म्याकरीता जायचो. हे म्हणणे खरे नाही की निकम डॉक्टर हे आमचे कुटुंबाचे डॉक्टर आहेत व आमची चांगली ओळख आहे. मी डॉक्टरांना जखमा झाल्या व रक्त येते हे सांगितले नव्हते. मी दवाखान्यात १५ मिनीटे होतो व डॉक्टरांनी मला भुल दिलेली नाही. दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर तीनच्या नंतर व चार वाजण्याच्या आत मी मोकळा झालो. मला अजित कदम याने

दवाखान्यात आणले होते. अजित कदम याचे पाणी आम्ही घेत नाही किंवा आम्ही त्याला पाणी देत नाही. हे म्हणणे खरे आहे की मी पोलीस स्टेशनला चार ते साडेचारच्या दरम्यान पोहोचलो व फिर्याद नोंदवून झाल्यानंतर पाचच्या आत मी तेथून बाहेर पडलो. हे म्हणणे खरे नाही की फिर्याद दयायला मी अजितच्या मोटारसायकलवर गेलो होतो. हे मला आठवत नाही की मी दवाखन्यातून पोलीस स्टेशनला चालत गेलो होतो किंवा रिक्षाने गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला मारले नाही व मी पडलो आणि त्यात मला मार लागला त्याचे भांडवल करुन मी आरोपीविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी व माझ्यामध्ये वाकूडपणा असल्यामुळे मी पडल्याचे भांडवल करुन मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहेत.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

कोरेगाव **(ए. ए.पाचरणे)**

दि. ०६/०२/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव